# सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्ती

SBI card

**सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्ती - एसबीआय कॉर्पोरेट कार्ड**
**(केवळ वैयक्तिक उत्तरदायित्व ग्राहकांना लागू)**

**1.** फी आणि शुल्क

A. सामील होण्याची फी, वार्षिक फी आणि नूतनीकरण फी (लागू असल्यास)

एसबीआय कॉर्पोरेट कार्ड (एसबीआय कार्ड) वर सामील होण्याची फी, वार्षिक फी आणि नूतनीकरण फी लागू होते. ही फी प्रत्येक कॉर्पोरेटसाठी तसेच प्रत्येक कार्डधारकासाठी आणि प्रत्येक ऑफरसाठी वेगवेगळी असू शकते. कॉर्पोरेट कार्डसाठी अर्ज करताना कॉर्पोरेट आणि कार्डधारक यांच्यातील झालेल्या संपर्कानुसार हे असू शकते. लागू असेल त्यानुसार, सामील होण्याची फी आणि वार्षिक फी कार्डधारकाच्या खात्यावर आकारली जाईल आणि ती फी आकारलेल्या महिन्याच्या कार्ड स्टेटमेंटमध्ये प्रदर्शित केली जाईल.

B. कॅश ॲडव्हान्स फी (लागू असल्यास)

कार्डधारक भारतातील किंवा भारताबाहेरील एटीएममधील एटीएम / कॅशपॉइंटवरुन आणीबाणीच्या वेळी कॅश काढण्यासाठी कार्ड वापरू शकतो. या सर्व शुल्कांवर व्यवहार फी आकारली जाते आणि आणि पुढील स्टेटमेंटमध्ये कार्डधारकाला बिल आकारले जाईल. देशांतर्गत एसबीआय एटीएम / कॅशपॉइंटवर 2.5% किंवा 450 रू. पर्यंतची व्यवहार फी जी जास्त असेल ती आणि देशांतर्गत अन्य एटीएममध्ये 450 रू. पर्यंत किंवा 2.5% जी जास्त असेल ती आणि आंतरराष्ट्रीय एटीएममध्ये 3% किंवा 450 रू. पर्यंत, जी जास्त असेल ती फी आकारली जाईल. व्यवहार शुल्क एसबीआय कार्ड्स अँड पेमेंट सर्व्हिसेस लिमिटेड (पूर्वी एसबीआय कार्ड्स अँड पेमेंट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) यांच्या निर्णयानुसार बदलले जाईल. सर्व कॅश ॲडव्हान्सेसनादेखील पैसे काढण्याच्या तारखेपासून निर्णयाच्या तारखेपर्यंत हे सेवा शुल्क लागू आहे. सध्या सेवा शुल्क दर महा 3.35% पर्यंत [40.2% प्रति वर्ष] आहे आणि एसबीआयसीपीएसएलने निर्णयाच्या अधिकारानुसार बदलण्याच्या अधीन आहे.

C. कॅश पेमेंट फी

कार्डधारक कोणत्याही एसबीआय शाखेत जाऊ शकतो आणि पे-इन-स्लीपमध्ये कॉर्पोरेट कार्ड नंबर आणि रक्कम दर्शवून आणि शाखेच्या काउंटरवर तितकेच पैसे देऊन थकबाकीचे पैसे हे एसबीआय कार्डने भरू शकतो. तुमच्या बिलाचे पैसे भरल्यानंतर झटपट पेमेंट पोचपावती दिली जाईल. ही सेवा 100 रू. अधिक लागू असलेले कर यामध्ये उपलब्ध आहे.

D. शुल्क

i . वेळोवेळी लागू असल्यानुसार, शुल्क आणि फी, कार्डधारकांना एसबीआयसीपीएसएलने दिलेल्या विशिष्ट सेवांकरिता किंवा कार्डधारकाने त्याच्या कार्डच्या संदर्भात केलेल्या डिफॉल्टसाठी कार्डधारकाने भरणे आवश्यक आहे.

ii. वेळोवेळी कार्डधारकांना पूर्व सूचना देऊन कोणत्याही शुल्कामध्ये किंवा फीमध्ये बदल करण्याचा किंवा कोणतेही नवीन शुल्क किंवा फी लागू करण्याचा, अधिकार एसबीआयसीपीएसएल ला आहे.

E. व्याजमुक्त वाढीव कालावधी

व्याजमुक्त क्रेडिट कालावधीची मुदत ही व्यापाऱ्याने दावा सबमिट केल्याच्या अधीन राहून 20 दिवसांपासून 50 दिवसांपर्यंत असू शकते. तथापि, मागील महिन्याची संपूर्ण थकबाकी न भरल्यास किंवा कार्डधारकाने कोणत्याही एटीएम / कॅश पॉइंटमधून कॅश घेतल्यास हे लागू होत नाही

F. वित्तीय शुल्क (सेवा शुल्क)

वित्तीय शुल्क कार्डधारकाने त्याच्याकडील देय पैसे पूर्णपणे न भरल्यास आणि कार्डधारकाने परत पैसे भरेपर्यंत, त्याने घेतलेल्या सर्व कॅश ॲडव्हान्सेसवर, व्यवहाराच्या तारखेपासून सर्व व्यवहारांवरील मासिक टक्केवारी दरावर देय असते.

जर कॉर्पोरेट किंवा कार्डधारक आंशिक पैसे देत असल्यास किंवा पेमेंट देय तारखेपूर्वी (पीडीडी) एकूण देय रकमेचे (टीएडी) पैसे भरत नसल्यास; म्हणजेच, जर ग्राहकाकडे मागील महिन्यांमधील आणि विद्यमान महिन्यातील थकबाकी असेल आणि देय तारखेच्या पूर्वी संपूर्ण पेमेंट केल्यास हे शूल्क देय तारखेच्या अखेरच्या शिलकीवर आकारण्यात येईल.

कार्ड व्याज दर हा डायनॅमिक असून कार्डधारकाच्या वापरावर आणि पेमेंट पद्धतीवर आधारित असेल आणि हे नियमित परीक्षणाच्या अधीन आहे. वित्तीय शुल्क दर हे व्यवहाराच्या तारखेपासून कमाल 3.35% प्रति महिना [40.2% प्रति वर्ष] पर्यंत वाढू शकते आणि एसबीआयसीपीएसएलने ठरवण्याच्या अधिकारात बदलण्याच्या अधीन आहे. वित्तीय शुल्क, देय असल्यास, लागू कर आकारणीच्या अधीन असते आणि कार्डचे पूर्ण पैसे भरले जाईपर्यंत कार्डधारकाच्या खात्यावर डेबिट केले जाते. कार्डधारकाद्वारे शेवटच्या देय तारखेपर्यंत (पेमंट जमा करण्याची शेवटची तारीख) त्याच्या शिल्लक रक्कमेचे (बॅलन्स) पूर्ण पेमंट न भरल्यास, सर्व व्यवहारांवर आकारल्या जाणाऱ्या फायनान्स चार्जेसचे किमान शुल्क आणि कार्डधारकाने घेतलेल्या सर्व कॅश ॲडव्हान्सेसवर वित्तिय शुल्क प्रत्येक व्यवहारांसाठी लागू असलेल्या टॅक्सेसला वगळता 25 रुपये असेल.

a) कॅश ॲडव्हान्सेसवर (लागू असल्यास) वित्तीय शुल्क हे पूर्ण पेमेंट केले जाईपर्यंत व्यवहाराच्या तारखेपासून लागू होते

**उदाहरण 1** - कार्ड स्टेटमेंट तारीख - प्रत्येक महिन्याची 2 तारीख

3 मार्च 17 - 2 एप्रिल 17 दरम्यान केलेले व्यवहार पुढीलप्रमाणे:

1. आयएनआर 5000 ची किरकोळ खरेदी - 10 मार्च 17 रोजी
2. आयएनआर 7000 कॅश काढणे (लागू असल्यास) - 30 मार्च 17 रोजी

2 मार्च 17 पासून स्टेटमेंटवरून कोणतीही मागील शिल्लक पुढे न ओढल्याचे गृहित धरून, कार्डधारकास 7,000 रू. कॅश काढताना लागू दरांमध्ये वित्तीय शुल्काच्या 3 दिवसांसह 12,000 रू. चा व्यवहार दाखवणारे त्याचे 2 एप्रिल 17 चे स्टेटमेंट मिळेल. कार्डधारकाने 22 एप्रिल 17 पासून देणे असलेले पेमेंट करण्याची आवश्यकता आहे, उदा. स्टेटमेंट तारखेपासून 20 दिवसांमध्ये. पेमेंट देय तारखेपर्यंत कार्डधारकाच्या एसबीआय कार्ड खात्याकरिता सर्व पेमेंट पूर्ण (एकूण देय रक्कम) भरावे लागेल याची कृपया नोंद घ्यावी. सर्वप्रथम करांचे पेमेंट भरले जावे यानंतर फी आणि इतर शुल्कानंतर, व्याज शुल्क, किरकोळ थकबाकी आणि शेवटी (असल्यास) कॅश शिल्लक.

a) मागील स्टेटमेंटपासून पूर्वीचे कोणतेही शिल्लक पुढे ओढल्यास मागील शुल्काच्या तारखेपासून वित्त शुल्काची आकारणी केली जाईल (थकीत किरकोळ शिलकीवर व्याज आकारले जात नाही तोपर्यंत, व्यवहाराच्या तारखेपासून वित्त शुल्क आकारले जाते).

b) स्टेटमेंटमध्ये रोख शिल्लक नसल्यास आणि मागील स्टेटमेंटमधून ती पुढे न ओढल्यास आणि स्टेटमेंट तारखेस थकित असलेल्या किरकोळ शिलकेचे पैसे हे पेमेंट देय तारखेपर्यंत पूर्ण भरावे लागतील, अशा शिलकीवर कोणत्याही वित्तीय शुल्क आकारले जाणार नाही.

**उदाहरण 2 -** कार्ड स्टेटमेंट तारीख - प्रत्येक महिन्याची 2 तारीख.

3 जाने 17- 2 फेब्रु 17 दरम्यान केलेले व्यवहार पुढीलप्रमाणे:

1. आयएनआर 10000 ची किरकोळ खरेदी -5 जाने 17 रोजी
2. आयएनआर 30000 ची ऑनलाइन खरेदी - 15 जाने 17 रोजी

2 जाने 17 पासून मागील शिल्लक पुढे न ओढणे गृहित धरून, कार्डधारकास 40,000 रू. चे व्यवहार दर्शवणारे त्याचे 2 फेब्रु 17 चे स्टेटमेंट मिळेल. कार्डधारकास 22 फेब्रु 17 पर्यंत थकित असलेले पेमेंट करण्याची आवश्यकता आहे, उदा. स्टेटमेंट तारखेपासून 20 दिवसांमध्ये. पेमेंट देय तारखेपर्यंत कार्डधारकाच्या एसबीआय कार्ड खात्याकरिता सर्व पेमेंट पूर्ण (एकूण देय रक्कम) भरावे लागेल याची कृपया नोंद घ्यावी. सर्वप्रथम करांचे पेमेंट भरले जावे यानंतर फी आणि इतर शुल्कानंतर, व्याज शुल्क, किरकोळ थकबाकी आणि शेवटी (असल्यास) कॅश शिल्लक. मागील स्टेटमेंटपासून पूर्वीचे कोणतेही शिल्लक पुढे ओढल्यास मागील

शुल्काच्या तारखेपासून वित्त शुल्काची आकारणी केली जाईल (थकीत किरकोळ शिलकीवर व्याज आकारले जात नाही तोपर्यंत, व्यवहाराच्या तारखेपासून वित्त शुल्क आकारले जाते).

**प्रत्येक महिन्यात केवळ किमान पेमेंट करण्यामुळे थकबाकीवर आनुषंगिक व्याजासह अनेक वर्षांचा ताण येऊन पेमेंट पुन्हा करावे लागू शकते.**

**उदाहरण 3:** कार्ड स्टेटमेंट तारीख - प्रत्येक महिन्याची 2 तारीख.

3 डिसें 16 - 2 जाने 17 दरम्यान केलेले व्यवहार

1. 500 रू. ची किरकोळ खरेदी - 15 डिसें 16 रोजी
2. 600 रू. ची ऑनलाइन खरेदी - 20 डिसें 16 रोजी

2 डिसेंबर 2016 पासून स्टेटमेंटवरून कोणतीही मागील शिल्लक पुढे न ओढल्याचे गृहित धरून, कार्डधारकास एकूण 1100 रू. देणे रक्कम असलेले, 1100 रू. चे व्यवहार दर्शवणारे त्याचे 2 जाने 17 चे स्टेटमेंट मिळेल. कार्डधारकास 22 जाने 17 पर्यंत थकबाकीचे पेमेंट करण्याची आवश्यकता आहे, उदा. स्टेटमेंटच्या तारखेपासून 20 दिवसांमध्ये.

कार्डधारकाने 22 जाने 17 रोजी, 500 रू. चे आंशिक पेमेंट केल्याचे गृहित धरून, प्रभावी दरांनी शुल्काची आकारणी केली जाईल आणि एकूण थकबाकीमध्ये जोडले जाईल. दरमहा 3.35% च्या प्रभावी दराचा विचार करून,

वित्तीय शुल्क मोजणी पुढीलप्रमाणे केली जाईल:

39 दिवसांसाठी 500 रू. च्या शिलकेवर (15 डिसें ते 22 जाने):

(3.35*12) * (39/365) *500/100 = 21.48 रू.

34 दिवसांसाठी 600 रू. च्या शिलकेवर (20 डिसें ते 22 जाने):

(3.35*12) * (34/365) *600/100 = 22.47 रू.

10 दिवसांसाठी 600 रू. च्या शिलकेवर (22 जाने ते 2 फेब्रु):

(3.35*12) * (10/365) *600/100 = 6.61 रू.

आकारलेले एकूण व्याज = 50.56 रू.

3 फेब्रु 17 - 2 मार्च 17 दरम्यान केलेले व्यवहार

1. 650.56 रू. आरंभीची शिल्लक - 3 फेब्रु 17 रोजी
2. 1000 रू. ची किरकोळ खरेदी - 5 फेब्रु 17 रोजी
3. 3000 रू. ची ऑनलाइन खरेदी - 15 फेब्रु 17 रोजी

2 फेब्रु 17 च्या स्टेटमेंटवरून 650.46 रू. ची मागील शिल्लक पुढे ओढल्याचे गृहित धरून, कार्डधारकाला 22 फेब्रु 17 पर्यंत थकबाकी असलेले पेमेंट करण्याची आवश्यकता आहे, उदा. स्टेटमेंट तारखेपासून 20 दिवसांमध्ये.

कार्डधारक 15 फेब्रु पर्यंत पूर्ण पेमेंट करेल हे गृहित धरून, उदा. पेमेंट देय

तारखेच्या आत. दरमहा 3.35% च्या प्रभावी दराचा विचार करून, वित्तीय शुल्क मोजणी पुढीलप्रमाणे केली जाईल:

12 दिवसांसाठी 650.56 रू. च्या शिलकेवर (3 फेब्रु - 15 फेब्रु):

(3.35*12) *(12/365) * 650.56/100 = 8.60 रू.

आकारलेले एकूण व्याज = 8.60 रू.

मुख्य खरेदी रक्कम, व्याज शुल्क, फी आणि शुल्क यांची रक्कम आणि सर्व लागू कर या सर्वांची बेरीज 2 मार्च रोजीच्या स्टेटमेंटमध्ये देय असलेल्या एकूण रकमेनुसार प्रतिबिंबित होतील.

**G.** पेमेंट विलंब शुल्क

पेमेट देय तारखेपर्यंत एकूण देय रकमेचे पैसे न भरले गेल्यास पेमेंट विलंब शुल्क लागू होईल.

**0 रू. - ते 200 रू. पर्यंत एकूण देय रकमेसाठी काहीही नाही;**

**200 रू. आणि 500 रू. पर्यंत एकूण देय रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी 100 रू.;**

**500 रू. आणि 1000 रू. पर्यंत एकूण देय रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी 400 रू.;**

**1000 रू. आणि 10,000 रू. पर्यंत एकूण देय रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी 500 रू.;**

**10,000 रू. एकूण देय रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी 750 रू.**

**उदाहरण 1** - कार्ड स्टेटमेंट तारीख - प्रत्येक महिन्याची 2 तारीख.

3 फेब्रु 17- 2 मार्च 17 दरम्यान केलेले व्यवहार पुढीलप्रमाणे:

1. आयएनआर 2000 ची किरकोळ खरेदी - 8 फेब्रु 17 रोजी;
2. आयएनआर 2500 ची ऑनलाइन खरेदी - 19 फेब्रु 17 रोजी.

2 फेब्रु 17 पासून स्टेटमेंटवरून कोणतीही मागील शिल्लक पुढे ओढली नसल्याचे गृहित धरून, कार्डधारकास 4500 रू. चे व्यवहार दर्शवणारे त्याचे 2 मार्चचे स्टेटमेंट मिळेल. कार्डधारकास 22 मार्च 17 पर्यंत थकबाकीचे पेमेंट करण्याची आवश्यकता आहे, उदा. स्टेटमेंट तारखेपासून 20 दिवसांनी. कार्डधारकाने पेमेंट देय तारखेपर्यंत पूर्ण पेमेंट न केल्यास (उदा. एकूण देय रक्कम), त्याच्यावर 500 रू. चे विलंब पेमेंट शुल्क आकारले जाईल (1,001 रू. - 10,000 रू. पर्यंत एकूण देय रकमेसाठी).

H. ओव्हर लिमिट शुल्क - कॉर्पोरेट कार्डसाठी लागू नाही

I. अस्वीकृत पेमेंट शुल्क

पेमेंट अस्वीकृत झाल्यास, कॉर्पोरेट कार्डधारकास किमान शुल्क 350 रू. च्या अधीन राहून पेमेंट रकमेच्या 2% फी पेमेंट अस्वीकृत केल्याबद्दल आकारली जाईल.

J. इतर शुल्क (लागू असल्यास):

- कार्ड बदलण्याची फी: 100/- रू. - 250/- रू.
- चेक फी: 100 रू. (2000 रू. पर्यंत चेकने केलेले पेमेंट)
- चेक पिक अप फी: 90/- रू.
- स्टेटमेंट पुनर्प्राप्ती फी: काहीही नाही
- विदेशी चलन व्यवहार फी: 3.5% पर्यंत आयएनआर मध्ये विदेशी चलन व्यवहार रुपांतरीत करण्यासाठी वापरलेला विनिमय दर हा VISA/MasterCard द्वारे निश्चित केला जाईल, तसे असल्यास, एसबीआय कार्डद्वारे केलेल्या व्यवहाराच्या तारखेस त्यांच्याकडून विनिमय दर व्यवस्थापित केले जाऊ शकतात, मात्र ज्या तारखेस व्यवहार करण्यात आला तीच ही तारीख नसावी. विदेशी चलन व्यवहार फी ही VISA/MasterCard द्वारे शेअर केलेल्या आयएनआर रूपांतरीत रकमेवर लागू केली जाईल.

**2. लिमिट**

कॉर्पोरेट कार्ड प्रोग्राम मॅनेजरकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार क्रेडिट लिमिट आणि कॅश लिमिट (लागू असल्यास) कार्डधारकास लावली जाते. कार्ड वितरणाच्या वेळी या लिमिट कार्डधारकास सांगितल्या जातात. प्रत्येक स्टेटमेंटमध्ये कार्डधारकास क्रेडिट लिमिट आणि कॅश लिमिट (लागू असल्यास) सांगितली जाते. स्टेटमेंट तयार करण्याच्या वेळी उपलब्ध क्रेडिट लिमिट (उदा. वापरासाठी उपलब्ध क्रेडिट लिमिट) ही स्टेटमेंटचा भाग म्हणून दिली आहे.

एसबीआयसीपीएसएल कॉर्पोरेट स्तर मर्यादेची नियमितपणे समीक्षा करू शकते तसेच ते अंतर्गत निकषांच्या आधारावर किंवा कॉर्पोरेट कार्ड प्रोग्राम मॅनेजरकडून प्राप्त झालेल्या विनंतीच्या आधारावर यास वाढवू किंवा कमी करू शकते. अशा कोणत्याही बदलांमुळे कार्डधारकाच्या लिमिटवर प्रभाव देखील पडू शकतो आणि हे कॉर्पोरेट कार्ड प्रोग्राम मॅनेजरला सूचित केले जाईल आणि तो संबंधित कार्डधारकास या माहितीचा अधिक तपशील देऊ शकेल. क्रेडीट लिमिट वाढवून घेऊ इच्छिणारे कार्डधारक हे एसबीआयसीपीएसएलला लेखी विनंती करून आणि त्यांचे उत्पन्न दर्शविणारी वित्तीय कागदपत्रे प्रदान करून त्यांची लिमिट वाढवू शकतात. तथापि, एसबीआयसीपीएसएल, पूर्णपणे त्याच्या निर्णयाच्या आधारे तसेच प्राप्त विनंती आणि कॉर्पोरेट कार्ड प्रोग्राम मॅनेजरच्या मंजुरीवर आधारित, कार्डधारकाचे क्रेडिट लिमिट वाढवू शकते.

**3. बिलिंग आणि स्टेटमेंट**

a) प्रदान केलेल्या कालावधीत कार्ड सक्रिय असेल तर, एसबीआयसीपीएसएल कार्डधारकाला मासिक स्टेटमेंट पाठवेल ज्यामध्ये मागील स्टेटमेंटपासून कार्डधारकाच्या खात्यात क्रेडीट झालेले पेमेंट आणि त्यामधून डेबिट झालेले

व्यवहार दर्शविले जातील. एसबीआयसीपीएसएल, एका पूर्व-निर्धारित तारखेस, नोंदणीकृत ईमेल आयडीवर ईमेल करून स्टेटमेंट पाठवेल.

b) एसबीआय कॉर्पोरेट कार्ड हे कार्डधारकास सतत बदलत राहणारी क्रेडिट सुविधा ऑफर करत नाही. कोणत्याही विशिष्ट स्टेटमेंटमधील थकबाकी ही कोणतेही दंडनीय शुल्क टाळण्यासाठी पूर्ण भरणे गरजेचे आहे.

c) थकबाकी असलेल्या कार्डचे केलेले पेमेंटची नोंद नंतरच्या स्टेटमेंटमध्ये घेतली जाईल. इनपुट टॅक्स क्रेडिट किंवा टॅक्सेस संबंधित कोणत्याही अन्य विवादांबद्दलची माहिती कॉर्पोरेट कार्ड जारीकर्त्यास स्टेटमेंट दिल्यानंतर 30 दिवसांच्या आत सूचित केली जाईल.

d) कार्डधारकाच्या थकबाकी असलेल्या कार्डसाठी मिळालेली पेमेंट ही, अनुक्रमे कर, फी आणि इतर शुल्क, व्याज आकारणी, खरेदी आणि कॅश ॲडव्हान्सेस यात समायोजित केली जातील. योग्य आणि वेळेवर माहिती देण्याची जबाबदारी ही कार्डधारकची असेल, जेणेकरून कॉर्पोरेट कार्ड जारीकर्ता उपयुक्त GST पालन करून घेऊ शकेल जेणेकरून कार्डधारक, कॉर्पोरेट कार्ड जारीकर्त्याद्वारे केल्या जाणाऱ्या सप्लाइजचे इनपुट टॅक्स क्रेडिट घेईल. कार्डधारकाद्वारे दिलेल्या चुकीच्या माहितीमुळे किंवा कार्डधारकाकडून झालेल्या कोणत्याही त्रुटी किंवा चुकीमुळे, कार्डधारकाला इनपुट टॅक्स क्रेडिटमध्ये झालेले नुकसान किंवा इनपुट टॅक्स क्रेडिट प्राप्त करण्यास झालेल्या विलंबासाठी कार्ड जारीकर्ता जबाबदार राहणार नाही.

e) कार्ड खात्यावरील पेमेंट हे पुढीलप्रमाणे कोणत्याही मार्गांनी केले जाऊ शकते:

- नेटबँकिंगद्वारे किंवा तुमच्या एसबीआय एटीएम म्हणजेच डेबिट कार्डद्वारे पेमेंट करण्यासाठी www.sbicard.com वर लॉग इन करून आणि Paynet पर्याय वापरणे.
- स्टेटमेंटच्या मागे दिलेल्या मेल करण्याच्या पत्त्यावर चेक किंवा ड्राफ्ट मेल करणे.
- तुमच्या शहरातील किंवा भारतातील स्टेटबँकेच्या कोणत्याही शाखेत कोणत्याही एसबीआय कार्ड ड्रॉप बॉक्समध्ये चेक किंवा ड्राफ्ट टाकणे. चेक/ड्राफ्ट येथे असा देय असावा “एसबीआय कार्ड नंबर xxxxxxxxxxxxxxx"
- एनएसीएच: निवडक शहरांमध्ये नॅशनल ऑटोमेटेड क्लीअरिंग हाऊस (एनएसीएच) च्या माध्यमातून पेमेंट केले जाऊ शकते.
- एनईएफटी:

  लाभार्थ्याचे नाव: स्टेट बँक ऑफ इंडिया, कमर्शिअल ब्रँच(04079), 6 वा मजला, पालम कोर्ट, महाराणा प्रताप चौक, एम.डी.आय. जवळ, गुरुग्राम-122001

  बँक खाते क्रमांक - 39735563903

  आयएफएससी कोड: SBIN0004079

f) एसबीआय कार्ड हे बिलाच्या थकबाकीचे पेमेंट करण्याचे विविध प्रकार ऑफर करते, हेच मासिक स्टेटमेंटच्या मागे आणि एसबीआय कार्ड वेबसाइटवर देखील दर्शवले आहे. कार्डधारकाकडून प्राप्त झालेली कोणतीही ॲडव्हान्स रक्कम ही भविष्यातील खर्चासाठी ॲडव्हान्स रक्कम मानली जाईल तसेच कोणत्याही चार्ज/शुल्कासाठी प्राप्त रक्कम मानली जाणार नाही.

g) बिलिंग विवाद: कॉर्पोरेट किंवा कार्डधारक एसबीआयसीपीएसएल ला जोपर्यंत कोणत्याही विसंगतीबद्दल सूचित करत नाही आणि या विसंगतींना एसबीआयसीपीएसएल द्वारे त्या खऱ्या असल्याचे आढळत नाही तोपर्यंत स्टेटमेंटवरील तारखेच्या 30 दिवसांमध्ये स्टेटमेंटमधील सर्व आशय हा अचूक असल्याचे मानले जाईल आणि कार्डदारकाद्वारे त्यास स्वीकृती दिली जाईल. अशी माहिती मिळाल्यावर, एसबीआयसीपीएसएल तात्पुरत्या स्वरूपात शुल्क मागे घेऊ शकते. त्यानंतरची तपासणी पूर्ण झाल्यावर अशा शुल्काचे उत्तरदायित्व कार्डधारकाच्या खात्यावर असेल, तर हा चार्ज पुढील स्टेटमेंटमध्ये आकारला जाईल.

h) ग्राहक तक्रार निवारण: सर्व तक्रार निवारण हे हेड- कॉर्पोरेट कस्टमर मॅनेजमेंट, डीएलएफ इन्फिनिटी टॉवर्स, टॉवर सी, 12 वा मजला, ब्लॉक 2, बिल्डिंग 3, डीएलएफ सायबर सिटी, गुरूग्राम-122002 (हरियाणा) भारत यावर चिन्हांकित केले जावे. कॉर्पोरेट कार्ड प्रोग्राम मॅनेजर किंवा कार्डधारक हा sbicorporate.services@sbicard.com वर ई-मेल करून किंवा 24-तास एसबीआय कार्ड हेल्पलाईनद्वारे कोणतीही चौकशी करण्यासाठी किंवा कोणत्याही तक्रार निवारणासाठी एसबीआयसीपीएसएल शी संपर्क देखील साधू शकतो: 1860 180 1290 , 39 02 02 02 (त्यापूर्वी स्थानिक एसटीडी कोड लावावा) - कार्ड खात्यावरील कोणतीही थकबाकी भरण्यासाठी पोस्टद्वारे, फॅक्स करून, टेलिफोन करून, ई-मेल, एसएमएस मेसेजिंग आणि/किंवा रीमाईंड करण्यासाठी तृतीय पक्षांना गुंतवून, फॉलोअप घेऊन वेळोवेळी पैसे वसूल करण्यात येतील. नियुक्त केलेल्या कोणत्याही तृतीय पक्षाने, कर्ज वसूलीबाबतच्या आचार संहितेचे पालन करणे आवश्यक आहे. कार्डधारकाच्या दिवाळखोरी नंतर किंवा कार्डधारकाचा मृत्यू झाल्यास कार्ड खात्यावर लागू झालेल्या परंतु अद्याप न आकारलेल्या सर्व चार्जेससह कार्ड खात्याची एकूण थकबाकी रक्कम एसबीआयसीपीएसला पूर्णपणे देय आणि पेमेंट करण्यायोग्य होईल तसेच कार्ड खाते त्वरित रद्द होईल. कार्ड खात्याच्या थकबाकी रक्कमेचे सेटलमेंट, कार्डधारकाच्या मालमत्तेमधून केले जाईल तसेच थकबाकी रक्कमेची परतफेड करण्यासाठी येणाऱ्या कायदेशीर शुल्क किंवा खर्चासह इतर सर्व खर्चासाठी कार्डधारकाद्वारे एसबीआयसीपीएसएलला हानिरहित ठेवणे आवश्यक असते. अशा रीपेमेंटचे प्रलंबनात, एसबीआयसीपीएसएल ला

त्याच्या चालू असलेल्या दरांनुसार वित्तीय शुल्क आकारणी चालू ठेवण्याचे अधिकार असतील.

**4. डिफॉल्ट**

डिफॉल्ट होण्याच्या स्थितीत, कार्डधारकाला कार्ड खात्यातील थकबाकी रक्कमेच्या सेटलमेंटसाठी पोस्ट, फॅक्स, टेलिफोन, ई-मेल, एसएमएस मॅसेजिंगद्वारे वेळोवेळी रिमाइंडर पाठविले जातील आणि/किंवा थकबाकी रक्कमेची आठवण करून देण्यासाठी व फॉलोअपसाठी तसेच थकबाकी रक्कमेची वसुली करण्यासाठी थर्ड पार्टीला नियुक्त केले जाईल. नियुक्त केलेल्या कोणत्याही तृतीय पक्षाने, कर्ज वसूलीबाबतच्या आचार संहितेचे पालन करणे आवश्यक आहे. कार्डधारकाच्या दिवाळखोरी नंतर किंवा कार्डधारकाचा मृत्यू झाल्यास कार्ड खात्यावर लागू झालेल्या परंतु अद्याप न आकारलेल्या सर्व चार्जेससह कार्ड खात्याची एकूण थकबाकी रक्कम एसबीआयसीपीएसला पूर्णपणे देय आणि पेमेंट करण्यायोग्य होईल तसेच कार्ड खाते त्वरित रद्द होईल. कार्ड खात्याच्या थकबाकी रक्कमेचे सेटलमेंट, कार्डधारकाच्या मालमत्तेमधून केले जाईल तसेच थकबाकी रक्कमेची परतफेड करण्यासाठी येणाऱ्या कायदेशीर शुल्क किंवा खर्चासह इतर सर्व खर्चासाठी कार्डधारकाद्वारे एसबीआयसीपीएसएलला हानिरहित ठेवणे आवश्यक असते. अशा रीपेमेंटचे प्रलंबनात, एसबीआयसीपीएसएल ला त्याच्या चालू असलेल्या दरांनुसार वित्तीय शुल्क आकारणी चालू ठेवण्याचे अधिकार असतील.

कार्डधारकाच्या डिफॉल्टची माहिती अशी क्रेडिट सूचना कंपनी, ज्यांच्याकडून आरबीआयकडून रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट प्राप्त केले आहे तसेच ज्याचा सदस्य एसबीआयसीपीएसएल आहे त्यांना माहिती देण्यापूर्वी आम्ही कार्डधारकाला एका महिन्याभराची नोटीस देऊ.

या व्यतिरिक्त हे देखील लक्षात घेतले पाहिजे की कार्डधारक डिफॉल्टर घोषित झाल्यानंतर, कार्डधारकाने त्यांची थकबाकी रक्कम क्लीअर केल्यास एसबीआयसीपीएस क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपनीकडून डिफॉल्टची स्थिती मागे घेईल. अशा प्रकारचे बदल हे कार्डधारकाच्या क्रेडिट रिपोर्टमध्ये दिसण्यासाठी 45-60 दिवस लागू शकतात. एसबीआयसीपीएसएल, क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपनीला कार्डधारकाचा डेटा दर महिन्याला निर्धारित फॉर्मेटमध्ये सबमिट करते. क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपनी सबमिट केलेला डेटा 30 दिवसांच्या कालावधीत त्यांच्या सर्व्हरवर अपलोड करते.

एसबीआयसीपीएसएल त्याच्या विवेकबुद्धीने कॉर्पोरेट कार्डसोबत थोडे विमा संरक्षण देखील देऊ शकते आणि त्यास कॉर्पोरेट/कार्डधारकास कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय हे काढून टाकण्याचा पूर्ण अधिकार देखील असतो. एसबीआयसीपीएसएल नेहमीच वेबसाइटवर अशा ऑफरचे तपशील अपडेट करेल. अपडेट केलेल्या तपशीलासाठी,

कॉर्पोरेट/कार्डधारकाने www.sbicard.com चा संदर्भ घ्यावा. संबंधित विमा संरक्षण हे कॉर्पोरेट कार्डधारकास कॉर्पोरेट कार्ड जारी केल्याच्या तारखेपासून लागू केले जाईल आणि/किंवा ॲक्टिव्हेट केले जाईल.

**5. कार्डधारकाचे निरस्तीकरण/रद्द करणे**

a) कॉर्पोरेट कार्ड प्रोग्राम मॅनेजर किंवा कार्डधारक, कॉर्पोरेट कार्ड प्रोग्राम मॅनेजरच्या मान्यतेने एसबीआयसीपीएसएलला कोणत्याही वेळेस लेखी सूचना देऊन किंवा एसबीआय कार्ड हेल्पलाईनवर कॉल करून आणि कार्ड तिरपे कापून हा करार रद्द केला जाऊ शकतो. कार्डधारकाद्वारे कार्ड खात्यावरील सर्व थकबाकी रक्कमेचे पेमेंट भरल्यानंतर करार रद्द केला जाईल. जॉइनिंग किंवा नूतनीकरण/वार्षिक शुल्क प्रमाणबद्ध आधारावर (प्रो-राटाबेसिस) परत केला जाणार नाही.

b) एसबीआयसीपीएसएल त्यांच्या व्यवसायासाठी किंवा सुरक्षा कारणांसाठी आणि/किंवा कोणत्याही कायद्याच्या अंमलबजावणी एजन्सीच्या आणि कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याच्या विनंतीनुसार आणि/किंवा कायदा आणि नियमनांतर्गत जे ही एसबीआयसीपीएसएल आणि त्याच्या ग्राहकास लागू होण्याकरिता योग्यरित्या आवश्यक वाटल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता केव्हाही कार्डधारक खात्याचा वापर प्रतिबंधित, निरस्त किंवा निलंबित देखील करू शकते.

c) कार्डधारक पेमेंट देय डिफॉल्ट करत असल्यास किंवा वाढवलेल्या क्रेडिट लिमिट उल्लंघन करत असल्यास, एसबीआयसीपीएसएल कॉर्पोरेट कार्डवरील सुविधा निलंबित करू शकते. करारनामा समाप्त झाल्यानंतर किंवा कार्ड खात्याचा वापर निलंबित केलेला असताना कार्ड वापरता येत नाही. अशा परिस्थितीत, कार्डधारकाद्वारे (कायद्याने आवश्यक असलेल्या कोणत्याही डिफॉल्ट किंवा अन्य नोटिसांच्या अधीन) खात्यावरील एकूण थकबाकी एसबीआयसीपीएसएलला त्वरित भरणे आवश्यक असते. यात सर्व व्यवहार आणि खात्यावर अद्याप न आकारलेल्या इतर रकमांसह, करारनाम्या अंतर्गत, एसबीआयसीपीएसएल ला देणे असलेल्या सर्व रकमा समाविष्ट असतात. कार्डधारक खाते हे कार्डधारकाने अशा सर्व देय रकमांचे पैसे दिल्याशिवाय, बंद झाले असे मानले जाणार नाही.

**6. कार्ड हरवणे/चोरीस जाणे/गैरवापर होणे**

a) कार्डधारकाने कॉर्पोरेट कार्ड सापडत नसल्यास, हरवल्यास, चोरीस गेल्यास, कापले गेल्यास, देणे असताना न मिळाल्यास किंवा त्याला/तिला कार्डधारकाच्या परवानगीशिवाय कॉर्पोरेट कार्डचा वापर होत असल्याचा संशय आल्यास एसबीआय कार्ड हेल्पलाइनशी शक्य तितक्या लवकर एसबीआयसीपीएसएलशी संपर्क साधावा. कार्ड हरवल्याची तक्रार करण्यात आल्यानंतर, जरी कार्डधारकास त्यानंतर

ते सापडले तरीदेखील ते, कोणत्याही परिस्थितीत वापरता येत नाही आणि कार्डधारकाने कार्ड अर्धे तिरपे कापणे आवश्यक आहे.

- कार्डधारक कार्ड तत्काळ आयव्हीआर वरून किंवा आमच्या www.sbicard.com या वेबसाइटवरून किंवा पीयूएलएल एसएमएस द्वारे ब्लॉक देखील करू शकतो.
- पीयूएलएल एसएमएस द्वारे तुमचे हरवलेले/चोरीस गेलेले कार्ड ब्लॉक करण्यासाठी, तुमच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवरून फक्त 5676791 वर SMS BLOCK XXXX करा. (XXXX = तुमच्या कार्ड नंबरचे शेवटचे 4 अंक). तुम्हाला तुमच्या विनंतीच्या 5 मिनिटांमध्ये कन्फर्मेशन एसएमएस न आल्यास, कार्ड ब्लॉक झाले आहे असे समजू नका. कृपया तुमचे कार्ड तत्काळ ब्लॉक करण्यासाठी आणि कोणताही गैरवापर टाळण्यासाठी हेल्पलाइनला कॉल करा.

b) कार्डधारकाने झालेल्या अनधिकृत व्यवहारांच्या आणि/किंवा कार्डची हानी किंवा चोरी झाल्यास त्याबद्दलच्या तक्रारीसाठी विविध चॅनेलपैकी कोणत्याही चॅनेलद्वारे एसबीआयसीपीएसएल ला सूचित करणे आवश्यक आहे. एसबीआयसीपीएसएल केवळ “ग्राहक संरक्षण - अनधिकृत इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांमध्ये ग्राहकांच्या दायित्वावरील प्रतिबंध” यावरील निर्देशांच्या दृष्टीने आणि त्यांच्या अनुषंगाने कोणत्याही अनधिकृत इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांकरिता जबाबदार नसेल.

एसबीआयसीपीएसएलकडे कार्डच्या हानीची तक्रार देण्यापूर्वी झालेल्या कोणत्याही व्यवहारांच्या खर्चाकरिता एसबीआयसीपीएसएलचे दायित्व नसते किंवा ते जबाबदार नसते आणि एसबीआयसीपीएसएलची त्रुटी नसताना ग्राहकाचे नुकसान झाल्यास त्याला कार्डधारक जबाबदार असेल. एसबीआयसीपीएसएलला नुकसानीची योग्य माहिती प्राप्त झाल्यानंतर (वेबसाइट, फोनबँकिंग, एसएमएस, ईमेल, आयवीआर किंवा समर्पित हेल्पलाइनद्वारे), कार्डधारकाचे त्यानंतरचे उत्तरदायित्व 1000 रुपयांच्या कमाल रक्कमेपर्यंत मर्यादित राहते. कार्ड गमावणे किंवा चोरी होण्याची सूचना एसबीआयसीपीएसएलला देण्याव्यतिरिक्त, कार्डधारकाने कॉर्पोरेट कार्ड चोरीची सूचना पोलिसांना देणे आणि एफआयआर नोंदविणे आवश्यक असते. तथापि, जेव्हा कोणालातरी कार्ड सापडते आणि तो त्याचा गैरवापर करतो किंवा कार्डधारकाच्या संमतीने पिनचा गैरवापर करतो तेव्हा सर्व नुकसानीसाठी कार्डधारकाचे दायित्व असेल.

c) कार्डधारकाने फसवणूक केल्यास सर्व नुकसानीसाठी कार्डधारकाचे दायित्व असेल. कार्डधारक कोणतीही योग्य खबरदारी न घेता कृती करत असेल, तर झालेल्या सर्व नुकसानीच्या खर्चासाठी कार्डधारकाचे दायित्व असेल. एसबीआयसीपीएसएलद्वारे निर्दिष्ट केल्यानुसार सेफगार्डचे पालन न केल्यास हे कार्डधारकास लागू होईल.

d) रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) दि. 06 जुलै 17 च्या ग्राहक संरक्षणासंदर्भातील आदेशानुसार - अनधिकृत इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांमध्ये ग्राहकांच्या दायित्वावर मर्यादा घालून, अनधिकृत क्रेडिट कार्ड व्यवहारांशी संबंधित ग्राहकांना संरक्षण देण्याकरिता एक धोरण तयार करण्यात आले. "ग्राहक तक्रार निवारण धोरण" अंतर्गत एसबीआय कार्डच्या वेबसाइटवर हेच अपडेट करण्यात आले आहे. हे धोरण ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीमध्ये पारदर्शकता आणि निष्पक्षपणाच्या तत्त्वांवर आधारित आहे.

e) एसबीआयसीपीएसएल हे, कार्डधारक किंवा कोणत्याही अतिरिक्त कार्डधारकाचा संदर्भ न देता-, एसबीआयसीपीएसएलने संबंधित कार्ड किंवा पिन ची हानी झाली असल्याचे, चोरी किंवा गैरवापर झाल्याचे लक्षात आल्यास ते पोलिसांना किंवा अन्य संबंधित अधिकाऱ्यांना कोणतीही माहिती देऊ शकते.

f) तुमच्या कॉर्पोरेट कार्डच्या संपर्क तपशीलातील बदल तुमच्या सिस्टीममधील नवीन तसेच मागील संपर्क तपशीलांना दिली जाऊ शकते. आमच्या रेकॉर्ड्समध्ये तुमचा विद्यमान संपर्क तपशील ठेवावा असा सल्ला आपणास दिला जातो.

**7. प्रकटीकरण**

कार्डधारक हे मान्य करतो की एसबीआयसीपीएसएल, कार्डधारकाचा रिपोर्ट करण्याच्या उद्देशाने पुरेशी सूचना दिल्यानंतर कार्डधारकची माहिती, कोणत्याही विद्यमान किंवा भावी क्रेडिट ब्युरोसोबत सामायिक करण्यास अधिकृत असते आणि अशी माहिती कार्डधारकाच्या सकारात्मक किंवा नकारात्मक कामगिरी/ डिफॉल्टशी संबंधित असू शकते. क्रेडिट ब्युरो अहवालात असे अपडेट दिसण्यासाठी 45-60 दिवस लागू शकतात. क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो इंडिया लि. (सीआयबीआयएल), हा भारतीय वित्तीय प्रणालीची कार्यक्षमता आणि स्थिरता यामध्ये सुधारणा करण्यासाठी, भारत सरकारचा आणि रिझर्व बँक ऑफ इंडिया (आरबीआय) चा उपक्रम आहे. हे बँका आणि वित्तीय संस्थांमधील माहितीचे आदान-प्रदान करण्यासाठी, त्याद्वारे विविध संस्थांमधील अधिक चांगल्या क्रेडिट अटींचा लाभ घेण्यासाठी कार्डधारकांना सक्षम करून प्रभावी तंत्रज्ञान प्रदान करण्यासाठी आरबीआयसोबतचे अनुरूप प्रयत्न आहेत. कार्डधारक हे देखील मान्य करतो की कार्ड खात्यांचे संपूर्ण संचालन, सत्यापन आणि अन्य प्रशासकीय सेवांसाठी एसबीआयसीपीएसएलला कार्डधारकाद्वारे पेमेंट करण्यात डिफॉल्ट होण्यासहित कार्डधारकाची माहिती वित्तीय संस्था, नियोक्ते आणि एसबीआयसीपीएसएलशी संबंधित इतर थर्ड पार्टीसोबत सामायिक करण्याचा अधिकार आहे. एसबीआयसीपीएसएल कोणतेही एसबीआयसीपीएलच्या कोणत्याही मुख्य, साहाय्यक, संबद्ध किंवा सहयोगींना, एसबीआयसीपीएसएल किंवा तिच्या समूह कंपन्या, साहाय्यक, संबद्ध आणि/किंवा सहयोगींना विविध उत्पादने आणि

सेवांचे मार्केटिंग करण्यासाठी आणि त्या ऑफर करण्याच्या हेतूने कार्डधारकांची माहिती शेअर देखील करू शकते.

एसबीआय कार्डच्या सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्ती www.sbicard.com वर देखील उपलब्ध आहेत

**महत्त्वाची नियामक माहिती**

- कार्ड हे भारत आणि परदेशात असे दोन्ही ठिकाणी वापरण्यासाठी वैध आहे. हे तथापि, नेपाळ आणि भूतानमध्ये विदेशी चलन व्यवहार करण्याकरिता वैध नाही.
- भारताबाहेरील व्यवहारासाठी कार्डचा वापर हा आरबीआयचे एक्स्चेंज मॅनेजमेंट रेग्युलेशन आणि फॉरेन एक्स्चेंज मॅनेजमेंट ॲक्ट, 1999 सह लागू कायद्यानुसार केला जाणे आवश्यक आहे. इंटरनेट ट्रेडिंग पोर्टलद्वारे फॉरेन एक्स्चेंज ट्रेडिंगला अनुमती नाही. कोणतेही उल्लंघन झाल्यास किंवा पालन न केल्यास, दंडनीय कृतीसाठी तुमचे दायित्व असू शकते. तुम्ही तुमच्या फॉरेन एक्स्चेंज एन्टायटलमेंटशी संबंधी तुमच्या अधिकृत डीलरचा (एडी) सल्ला घेऊ शकता.
- तुमच्या कॉर्पोरेट कार्ड खात्यामध्ये कोणताही क्रेडिट बॅलन्स असल्यास, एसबीआय कार्डकडे तुम्हाला हा क्रेडिट बॅलन्स परत करण्याचा अधिकार आहे.
- कृपया भारताबाहेरील संस्थांमध्ये गुंतवणूक करणे किंवा आरबीआयच्या मुख्य निर्देशांतर्गत फंडिंग करण्यास परवानगी देता येत नसल्याने भारताबाहेरील संस्था स्थापन करणे इ. करिता पैसे पाठवण्यासाठी/भांडवल खात्याच्या व्यवहारांसाठी कॉर्पोरेट कार्ड वापरू नका - संयुक्त उपक्रमात नागरीकांनी थेट गुंतवणूक/पूर्णपणे मालकी असलेली विदेशातील साहाय्यक.
- आरबीआयच्या मुख्य सर्क्युलरनुसार- भारतातील संकीर्ण पैसे पाठवण्यावर मुख्य सर्क्युलर नागरीकांसाठी सुविधा, कॉर्पोरेट कार्डवरील वापर हा लॉटरी तिकीटे, बॅन केलेली किंवा निषिद्ध मॅगझीन, स्वीपटेक्स मधील सहभाग, कॉल-बॅक सेवांचे पेमेंट इ. अशा आयटम/ॲक्टिव्हिटीकरिता फॉरेन एक्स्चेंजच्या कोणत्याही ड्रॉ साठी परवानगी नसल्यामुळे प्रतिबंधित आयटमच्या खरेदीसाठी प्रतिबंधित आहे. कृपया अधिक तपशीलासाठी नागरिकांकरिता भारतातील सुविधांमधून संकीर्ण पैसे पाठवण्याबाबत मुख्य सर्क्युलरचा संदर्भ द्या.

## 8. शुल्काचे शेड्यूल

| फी | प्लॅटिनम स्वाक्षरी व्हर्च्युअल कार्ड | | |
|---|---|---|---|
| जॉईनिंग शुल्क (एका वेळचे) | शून्य | शून्य | शून्य |
| वार्षिक शुल्क (प्रती वर्ष) | शून्य | 499 रू. | शून्य |
| **एक्सटेंडेड क्रेडिट** | | | |
| व्याजमुक्त क्रेडिट कालावधी | 20-50 दिवस (केवळ किरकोळ खरेदीवर लागू असते तसेच मागील महिन्याच्या थकबाकी बॅलन्सचे पेमेंट पूर्ण भरले असल्यास)<br>15-32 दिवस (केवळ एसबीआय कॉर्पोरेट यूटिलिटी कार्डच्या बाबतीत लागू आहे | | |
| फायनान्स चार्जेस# | व्यवहाराच्या तारखेपासून 3.35% दरमहा (40.2% प्रति वर्ष) (हे चार्ज कार्ड आहे आणि रिवॉल्विंग सुविधा देत नाही) | | |
| पेमेंट योग्य एकूण रक्कम | एकूण थकबाकी रक्कम | | |
| **कॅश ॲडव्हान्स (लागू असल्यास)** | | | |
| कॅश ॲडव्हान्स लिमिट (लागू असल्यास) | परिवर्तनशील | | |
| मोफत क्रेडिट कालावधी | काहीही नाही | | |
| वित्तीय शुल्क# | पैसे काढण्याच्या तारखेपासून 3.35% दरमहा (40.2% प्रति वर्ष) | | |
| **कॅश ॲडव्हान्स फी (लागू असल्यास)** | | | |
| एसबीआय एटीएम/इतर स्थानिक एटीएम | पैसे काढण्याच्या रक्कमेच्या 2.5% पर्यंत किंवा प्रती व्यवहार रू. 450 (जे अधिक असेल ते) पर्यंत | | |
| आंतरराष्ट्रीय एटीएम | पैसे काढण्याच्या रक्कमेच्या 3% पर्यंत किंवा प्रती व्यवहार रू. 450 (जे अधिक असेल ते) पर्यंत | | |
| **इतर चार्जेस आणि शुल्क (लागू असल्यास)** | | | |
| कॅश पेमेंट शुल्क | 100 रू. | | |
| चेक पिकअप | 90 रू. | | |
| स्टेटमेंट पुनर्प्राप्ती फी: | काहीही नाही | | |
| चेक फी | 100 रुपये (2000 रुपयांपर्यंत चेक पेमेंट) | | |
| पेमेंट/देय अस्वीकार शुल्क | अस्वीकृत पेमेंट फी पेमेंट रक्कमेच्या 2% (किमान 350 रुपयांच्या अधीन) | | |

| | |
|---|---|
| **विलंब पेमेंट** | **0 रू. - ते 200 रू. पर्यंत एकूण देय रकमेसाठी काहीही नाही;**<br>**200 रू. आणि 500 रू. पर्यंत एकूण देय रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी 100 रू.;**<br>**500 रू. आणि 1000 रू. पर्यंत एकूण देय रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी 400 रू.;**<br>**1000 रू. आणि 10,000 रू. पर्यंत एकूण देय रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी 500 रू.;**<br>**10,000 रू. एकूण देय रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी 750 रू.** |
| ओव्हरलिमिट | कॉर्पोरेट कार्डसाठी लागू नाही |
| इमर्जन्सी कार्ड रिप्लेसमेंट | कॉम्प्लिमेंटरी |
| विदेशी चलन व्यवहार | कन्व्हर्जन मार्क अप: 3.5% पर्यंत |
| वार्षिक प्राथमिकता पास शुक्ल | प्लॅटिनमसाठी 180 रुपयांपर्यंत आणि सिग्नेचरसाठी मोफत |
| प्राथमिकता पास लाउंज चार्जेस | प्राथमिकता पास प्रोग्रामद्वारे भारतात आणि भारताबाहेरील सर्व एयरपोर्ट लाउंज विजिटचे शुल्क प्रत्येक विजिटसाठी $27 असेल तसेच लागू कर देखील आकारले जातील.<br>अधिक माहितीसाठी, कृपया sbicard.com वर भेट द्या<br>प्राथमिकता पास असलेल्या एसबीआय कार्डधारकासह एयरपोर्ट लाउंजला भेट देणाऱ्या सर्व अतिथींना लागू करांसह प्रत्येक विजिटसाठी $27 शुल्क आकारले जाईल. |
| वार्षिक रिवॉर्ड शुल्क | 300 रू. पर्यंत |
| रिवॉर्ड रिडेम्प्शन शुल्क | 99 रू. |

| सरचार्ज | |
|---|---|
| रेल्वे तिकिट - रेल्वे काउंटर | 30 रुपये + व्यवहार रक्कमेच्या 2.5% |
| रेल्वे तिकिट www.irctc.co.in | व्यवहार रक्कमेच्या 1.8% + सर्विस चार्ज, जसे लागू असेल व्यवहार मूल्याच्या 1%. |
| पेट्रोल पंपांवर विक्री केले जाणारे पेट्रोल आणि सर्व उत्पादने/सेवा | सिग्नेचर आणि प्लॅटिनम कार्ड्ससाठी 500 रुपये आणि 4000 रुपयांदरम्यान केलेल्या एकाच व्यवहाराच्या खर्चासाठी 1% सरचार्ज सूट (लागू असेल तेथे सर्व लागू कर + इतर चार्जेस वगळता) आहे.<br>सिग्नेचर आणि प्लॅटिनम कार्ड्ससाठी कमाल सरचार्ज सूट 250 रुपये प्रति स्टेटमेंट सायकल प्रती कॉर्पोरेट कार्ड खाते |
| कस्टम ड्युटीचे पेमेंट | व्यवहार रक्कमेच्या 2.25% (किमान रक्कम 75 रुपयांच्या अधीन) |
| पेमेंटचा क्रम | एकूण थकबाकी रक्कम (ज्यामध्ये सर्व लागू करांचा समावेश असेल), त्यानंतर शुल्क आणि इतर चार्जेस, व्याजाचे चार्जेस, किरकोळ थकबाकी रक्कम आणि कॅश अॅडव्हान्स. |

* शुल्काच्या शेड्यूलमधील कोणतेही बदल ईमेलद्वारे कळवले जातील आणि www.sbicard.com या आमच्या वेबसाइटवर उपलब्ध असतील

# कार्ड वित्तीय शुल्क हे डायनॅमिक असून कार्डधारकाच्या वापरावर आणि पेमेंट पॅटर्नवर आधारित असेल आणि नियमित अवलोकनाच्या अधीन आहे.

सर्व करांवर उपरोक्त फी, व्याज आणि शुल्क या सर्वांवर लागू असल्यानुसार शुल्क आकारले जाईल.

“लागू कर” (1 जुलै, 2017 रोजी किंवा त्यानंतर जारी केलेल्या स्टेटमेंटसाठी) म्हणजे:

- एसबीआय कार्डच्या नोंदीनुसार कार्डधारकाचा अधिवास स्टेट्मेंटच्या तारखेपर्यंत “हरियाणा” असेल तर केंद्रीय कर @ 9% आणि राज्य कर @ 9%

- एसबीआय कार्डच्या नोंदीनुसार कार्डधारकाचा अधिवास स्टेट्मेंटच्या तारखेपर्यंत “हरियाणा” व्यतिरिक्त असेल तर एकात्मिक कर 18%

तुमच्या कार्डचा सततचा वापर केला जाणे हेच या दुरुस्त्यांना स्वीकृती असे मानले जाईल.

एसबीआय कार्ड हेल्पलाइन

39 02 02 02 (यापूर्वी स्थानिक एसटीडी कोड लावावा), 1860 180 1290

या दस्तऐवजात उल्लेखित सर्व अटी आणि शर्ती (शुल्काच्या शेड्यूलसह) या सर्व कॉर्पोरेट्सला लागू मानक शर्ती आणि शुल्क आहे. यामधील कोणतेही बदल हे एका स्वतंत्र परिशिष्टाद्वारे किंवा कॉर्पोरेटची स्वाक्षरी असलेल्या कॉर्पोरेट कार्ड करारनाम्याचा भाग असलेल्या एसबीआयसीपीएसएल आणि संबंधित कॉर्पोरेट यांच्यातील परस्पर सहमती असेल.

या संप्रेषणातील सर्व माहिती ऑक्टोबर 2019 नुसार अचूक आहे आणि एसबीआयसीपीएसएलच्या ठरवण्याच्या अधिकारात बदलण्याच्या अधीन आहे. एसबीआय कार्डच्या सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्ती www.sbicard.com वर देखील उपलब्ध आहेत

एसबीआय कार्ड अँड पेमेंट सर्व्हिस लि.
पी. ओ. बॅग नं. 28, नवी दिल्ली - 110 001
कृपया येथे आमच्या वेबसाइटला भेट द्या: www.sbicard.com

Individual Liability SI21102019